**टिपण**

# वाचन कसे आणि का शिकावे?

वैशाली गेडाम

मुलांना आशयपूर्ण वाचन व स्वमताने लेखन करता यायला लागले की मुलांच्या शिकण्याला वेग येतो. मुलांना अभ्यास आवडू लागतो. वाचनाचा ब लेखनाचा आवाका वाढतो. मजकूर वाचून त्याचे आकलन होते. त्यामुळे वाचलेले समजते म्हणून वर्गात लक्ष लागते. प्रश्नांची उत्तरे लिहिता यायला लागतात. गोष्ट, निबंध, पत्रलेखन करता येऊ लागते. म्हणून मुलांना वाचन लेखन आले पाहिजे असे शिक्षण विभाग वारंवार म्हणत असतो व त्यासाठी शिक्षण यंत्रणा आग्रही असते. या आग्रहातून वेगवेगळ्या योजना आणल्या जातात. मात्र मागील पंधरा वर्षापासून खास वाचन लेखनावरच बरेच उपक्रम शासन राबवत आहे मात्र अजूनही ४० टक्के विद्यार्थी वाचन करू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

प्रामुख्याने सामान्य मुले, जी शाळेत येतात, ज्यांना शारीरिक किंवा मानसिक असा कोणताच गंभीर आजार नसतो परंतु तरीही ती अभ्यासात मागे असतात, वयानुरूप, इयत्तेनुरूप वाचन करण्यात मागे पडतात अशा मुलांना शिकण्याच्या प्रवाहात कसे आणावे व इतर मुलांप्रमाणे त्यांचेही शिकणे कसे सुकर करावे यावर सातत्याने विचारमंथन सुरू असते. शाळेत येऊनही शैक्षणिक गुणवत्तेत मागे पडणारी सामान्य मुले हा आपल्यासाठी चिंतेचा विषय आहे.

मूल शाळेत येतंय पण शिकत नाही यास पालक निश्चितच जबाबदार नाहीत ही गोष्ट आपण सर्वप्रथम लक्षात घेतली पाहिजे. मुलांच्या शिकण्याची जबाबदारी शिक्षण व्यवस्थेने घेतलीय त्यामुळे मुलांच्या शिकण्या न शिकण्यास संपूर्ण शिक्षण व्यवस्था जबाबदार आहे. मूल नॉर्मल दिसतंय, शाळेतही रोज येतंय, मात्र शिकत नाही किंवा शिकविण्यास गेल्यास त्याला समजत नाही, इतर मुलांसारखं ते शाळेचा अभ्यास करत नाही, शाळेत दोन चार वर्षापासून येतंय पण अजून वाचता लिहिता येत नाही याचा अर्थ त्या मुलाच्या शिकण्यात दोष नसून मुलाला समजून घेण्यात दोष आहे हे लक्षात घ्यावे.

आपण हे लक्षात घेतले पाहिजे, की वाचता लिहिता न येणे ही मूळ समस्याच नाही. मात्र आपण तीच मूळ समस्या मानून बसलोय. अडचण येथेच आहे. समस्या वाचता लिहिता न येण्याची नसून मुलांना व्यक्त होता येत नाही आहे ही मूळ समस्या आहे. एक सामान्य दिसणारे मूल, घरी सर्व काही बोलते मात्र शाळेत बोलत नाही, एक सामान्य दिसणारे मूल आजूबाजूच्या व्यक्तींना

---

लेखिका चंद्रपूरस्थित असून प्राथमिक शिक्षिका आहेत.

ईमेल- gedam.vai@gmail.com

ओळखते, सामान्य क्रिया करते, खेळांमध्ये वगैरे भाग घेते आणि तरीपण त्यास वाचन लेखन शिकण्यात अडचण येते असे जर होत असेल तर मुलाचा (मुलगा आणि मुलगी अशा दोन्ही अर्थाने) आय क्यू तपासण्याऐवजी आपले कुठे चुकतेय का हे तपासून बघावे.

मला अनेक शिक्षक विचारतात, की त्यांच्या वर्गामध्ये अशी मुले आहेत की ज्यांना कितीही वेळा एकच गोष्ट सांगितली तरी लक्षात राहत नाही. अशा मुलांसाठी काय करावे?

एक शिक्षक म्हणाले, माझ्या वर्गात एक मुलगा आहे. त्याला कितीही सांगितलं तरी तो विसरून जातो. मी त्याला 'अजय घर बघ' हे वाक्य वाचून दाखवलं तर तेवढ्यापुरतं तो ते म्हणतो, मग थोड्यावेळाने विचारलं तर तो ते नाही वाचू शकत. त्याला ते एकच वाक्य पानभर लिहायला सांगितलं तर तो ते लिहितो पण काय लिहिलं आहे हे तो विसरून जातो. काय उपाय करू?

त्या शिक्षक बंधूने शिकविल्याप्रमाणे काही मुले शिकतात. मात्र सर्वच मुले या पद्धतीने वाचन शिकू शकत नाहीत. म्हणून त्यावर उपाय सुचविण्याच्या हेतूने मी त्यांना विचारते, त्या मुलाला/मुलीला आजूबाजूच्या माणसांची, प्राण्यांची, झाडांची, वस्तूंची ओळख आहे काय? ते 'हो' असे उत्तर देतात. मग मी विचारते, ते त्यांच्या दैनंदिन उपयोगात येणाऱ्या वस्तूंचा योग्य वापर करतात काय? ते 'हो' म्हणतात. मी पुढे विचारते, ते नॉर्मल बोलतात काय? ते 'हो' म्हणतात. मी विचारते, मग अडचण कुठे आहे? ते म्हणतात, त्याला शिकविलेले लक्षात राहत नाही.

मी पुढे विचारते, मग तुम्ही आतापर्यंत जे काही त्याला माहीत आहे असे सांगितले होते ते त्याला कसे आठवत आहे? इतक्या साऱ्या माणसांचे चेहरे त्याच्या आठवणीत आहेत, त्यांची नावे आठवणीत आहेत, घरातील वस्तू, ताट, वाटी, ग्लास, कप, चटई, टेबल, खुर्ची, बेड, चादर, अशा वस्तू- गाय, बैल, कुत्रा, मांजर असे प्राणी आणि अगदी चित्रात पाहिलेले वाघ, सिंह आदी आठवणीत आहेत. मग ती पन्नास अक्षरेच कशी काय आठवणीत राहत नाहीत? यावर सहसा मला उत्तर मिळत नाही. मग मी पुढे सांगते, त्याला जे काही माहित आहे ते त्याने प्रत्यक्ष पहिले व अनुभवले आहे. घरातील माणसांची नावे व त्यांचे चेहरे तो ओळखतो कारण त्याने ते प्रत्यक्ष पाहिलेले आहेत व त्यांच्यासोबत तो वावरला आहे. घरातील, परिसरातील वस्तू तो ओळखतो कारण त्याने त्या प्रत्यक्ष पहिल्या आहेत व त्याने त्यांच्याशी आंतरक्रिया केलेल्या आहेत. नुसत्याच प्रत्यक्ष पहिल्या म्हणून नाही आठवणीत आहेत; तर ती माणसे त्याचेवर प्रेमही करत आहेत. या वस्तू त्याने नुसत्या पाहिल्या म्हणून नाही त्यांची ओळख झाली तर त्या वस्तूंची नावे त्यांच्यासोबत राहणारांनी अत्यंत प्रेमाने, कौतुकाने, त्यांना ती माहीत व्हावीत म्हणून सांगितली आणि ती आजूबाजूची माणसे त्या वस्तूंचा सातत्याने वापर करतात म्हणून त्या बाळाला त्यांची नावे व आकार, रंग, रूप माहीत आहे- म्हणून तो हे सारे ओळखतो. त्या वस्तू, नावे, चेहरे ओळखायला लागल्यावर त्याच्यासोबतची माणसे त्याचे कौतुक करतात व त्याने हुरूप येऊन मूल आणखी वेगाने इतर गोष्टी शिकते.

तुम्ही त्याला जे 'अजय घर बघ' असे पानभर लिहायला आणि वाचायला सांगितलं, तर त्या वाक्याशी त्याच्या भावना कुठे जुळलेल्या आहेत? मग ज्यात भावना जुळलेल्या नाहीत अशी गोष्ट लक्षात रहावी म्हणून आपण अट्टाहास का धरावा? त्यापेक्षा त्या मुलाच्या विश्वात शिरून त्याला काय आवडते, त्याचा आनंद कशात आहे हे जाणून घेऊन, त्याच्याशी अनोपचारिक संवाद साधून तो जे बोलतो तेच त्याला लिहून द्या. तेच वाचून दाखवा. त्याला आनंद होईल. त्याला हे कळेल, की जे बोलले जाते तेच लिहिले जाते. त्याने बोललेले वाक्य जर तुम्ही त्याला लिहून दिले तर तो ते विसरेल का? शिक्षकांकडून 'नाही' असे उत्तर येते.

आधीच्या ज्ञानावर आधारित पुढील ज्ञान स्वतः

तयार करणे किंवा जाणून घेणे म्हणजे आधीच्या ज्ञानाचा आधार घेऊन पुढील ज्ञान मेंदूत तयार होणे ही प्रक्रिया ज्ञानरचनावादात घडते. समजा, शिक्षकाने मुलाने वाचन शिकावे या उद्देशाने ‘अजय घर बघ’ हे वाक्य किंवा तत्सम इतर वाक्य शाळेत पहिल्या वर्गात दाखल झालेल्या मुलाला वाचून दाखवलं. आणि हे वाक्य अत्यंत प्रेमाने जरी वाचून दाखवलं; कार्डांवर लिहून, त्याची योग्य ती रचना करून, विविध खेळ घेऊन जरी वाचून दाखवलं तरी ते मूल मात्र अजून ‘अक्षरवाचन किंवा शब्दवाचन’ या कौशल्याशी अपरिचित आहे त्यामुळे त्याच्या आधीच्या ज्ञानाचा सबंध तिथे जोडला जात नाही. कारण हे वाक्य त्याच्यासाठी परकं असतं. त्यामुळे त्याला हे वाक्य आठवण राहत नाही. परंतु मुलाने ज्या गप्पा शिक्षकाशी केल्या त्यातीलच एखादं वाक्य मुलाच्या पाटीवर, वहीत लिहून दिल्यानंतर ज्ञानरचनावाद कसा काम करतो ते पहा, त्या मुलाला बोलण्याचे कौशल्य प्राप्त झाले आहे. त्याच्याजवळ काही शब्दसंपत्ती आहे. त्याला वाक्यरचना करण्याचे कौशल्य प्राप्त झाले आहे. म्हणजे इत्यादी कौशल्य, ज्ञान त्याच्यापाशी आहे. आता या त्याच्यापाशी असलेल्या ज्ञानाला आणखी पुढे नेण्यासाठी त्याच्यासोबत त्याच्यापेक्षा थोड्या अधिक गोष्टी, माहिती, कौशल्ये माहीत असलेली एक व्यक्ती शिक्षक म्हणून त्याच्यासोबत आहे. या शिक्षकाचे काम हे आहे, की त्याने जे बोलण्याचे कौशल्य प्राप्त केले आहे त्या कौशल्याच्या आधाराने हे बालक आता पुढील ‘वाचन’ हे कौशल्य शिकणार आहे. शिक्षक एक अभिभावक म्हणून, सुलभक म्हणून त्याच्यासोबत आहे. आता त्याने बोललेलेच वाक्य शिक्षकाने त्याच्यासमोर त्याला लिहून दिले तर त्याला हे कळते, की हे जे काही लिहिल्या गेलं आहे ते माझ्याकडूनच घेतल्या गेलं आहे. हे माझंच आहे. त्याने बोललेलं, म्हटलेलं वाक्य असल्यामुळे ते त्याच्या लक्षात राहते व ते तो सहजतेने वाचतो. हे वाक्य तो विसरत नाही. वाचताना अक्षरांचा परिचय होत जातो. त्याने वाचल्यानंतर त्याचे कौतुक केले की त्याला प्रेरणा मिळते व तो पुन्हा नवे वाचून पाहण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी मूल आपल्या शिक्षकांना पुन्हा नवे वाक्य सांगतो व लिहून मागतो आणि मग ते वाचण्याचा सराव करतो. अशा रीतीने अगदी सहजपणे त्याचा वाचन या कौशल्याशी परिचय होतो व ते त्याला आवडू लागते. आणि खरे तर हाच ज्ञानरचनावाद आहे. साहित्य, खेळ, साधनासहीतचे खेळ, विशिष्ट आकृत्यांची रचना करून वाचनाचे खेळ खेळणे, शब्दकार्डे, अक्षरकार्डे, वाक्यकार्डे, पुस्तके ही सगळी वाचन शिकण्यास सहाय्यक ठरणारी साधने आहेत.

अभिव्यक्ती ही माणसाची मूलभूत गरज आहे. म्हणून ज्ञानारचनावादाची पहिली पायरीदेखील ‘अभिव्यक्ती’च आहे. मूल शिक्षकाशी गप्पा मारते तेव्हा ते अभिव्यक्त होत असते. कितीतरी गोष्टी यावेळी मूल आपल्या शिक्षकासोबत शेअर करीत असतं, अभिव्यक्तीला वाव न मिळाल्यास कित्येक मुले कोमेजतात व अभ्यासात मागे पडतात. काही मुले धीट असतात किंवा दुसऱ्यांशी पटकन संवाद साधणारी असतात. म्हणून मग अशी मुले शिक्षकाचे शिकविणे लवकर आत्मसात करताना दिसतात. काही मुले जराशी बुजरी किंवा लाजरी असतात. त्यांनाही शिक्षकांशी, इतरांशी बोलण्याची इच्छा असते पण त्यांच्या स्वभावामुळे ते पटकन इतरांशी संलग्न होत नाहीत. त्यांच्या मनात काही विचारप्रक्रिया सुरू असतात. त्यामुळे शिक्षक काय बोलत आहेत याकडे त्यांचे लक्ष नसते व शिक्षकाने सांगितलेली गोष्ट ते करू शकत नाहीत. त्यामुळे अशी मुले शिक्षकांना समस्याप्रधान वाटतात व मग त्या मुलांकडे पाहण्याचा शिक्षकाचा दृष्टिकोन बदलतो. अशी मुले अध्ययन अक्षम किंवा गतिमंद वाटू लागतात. कितीही वेळा सांगितले तरी मुले विसरून जातात अशी शिक्षकाची भावना बनते व मुलांच्या शिकण्यात अडथळे येऊ लागतात. म्हणून

मुलांना समजून घेणे फार गरजेचे आहे.

मुले विविध माध्यामातून अभिव्यक्त होऊ पाहतात. बोलण्यातून, कृतीतून, कलेतून, खेळातून मुलांना व्यक्त व्हावेसे वाटत असते. मुलांना प्रत्येक माध्यमातून व्यक्त होऊ द्यावे. मुलांचे बोलणे, उत्साहाने, आस्थेने, हावभावांसह ऐकून घ्यावे. त्याला प्रतिसाद द्यावा. त्यापैकी चित्र काढणे हे सर्व मुलांचे आवडते अभिव्यक्ती माध्यम आहे. म्हणून मुलांना मनसोक्त चित्रे काढू द्यावीत. मुलांच्या मनात विविध गोष्टी, कल्पना, विचार असतात. ह्या गोष्टी. विचार. कल्पना ते चित्राच्या माध्यामातून व्यक्त करीत असतात. मुलांच्या चित्रांना संदर्भ असतात. आपणा मोठ्या माणसाना जरी त्या चित्रात विशेष काही दिसत नसलं तरी मुलांची पूर्ण कल्पना, विचार, गोष्ट त्यात त्याने चित्रित केलेली असते. काढलेली चित्रे वाचून दाखवायलाही मुलांना आवडते. त्यासाठी ते ऐकणारं, समजून घेणारं कुणीतरी प्रेमळ माणूस जवळ हवं असतं त्यांना. आणि त्याच दृष्टिकोनातून ते आपल्या शिक्षकाकडे बघत असतं, म्हणून शिक्षकाने आपली भूमिका पार पडायला हवी.

मुलांना चित्र काढायला आवडते. त्यासाठी त्यांना चित्र काढण्याची संधी मिळायला हवी. शिक्षकाने दिवसभर मुलांना शिकवितो म्हटलं तर मुलांना चित्र काढण्यासाठी मोकळा वेळ मिळणार नाही. म्हणून मुलांना शाळेत मोकळीक हवी असते. नुसतीच मोकळीक असून चालत नाही; तर चित्र काढण्याचं साहित्यदेखील मुलांना सहजपणे उपलब्ध झाले पाहिजे. चित्र काढण्यासाठी वर्गात मुलांना भिंतीवर जागा असायला हवी. कागद, पेन्सील, रंगदेखील वर्गात उपलब्ध हवेत. मनात चित्र काढण्याची इच्छा झाली तेव्हा चित्र काढण्याची संधी मिळायला हवी. चित्र काढण्यामुळे मुलांचे कल्पनाविश्व विस्तारत जाते. रंगांचे, रंगसंगतीचे ज्ञान वाढत जाते. काढलेले चित्र मूल आपल्या शिक्षकाला समजावून सांगते. मुले त्या चित्राची गोष्टही तयार करतात. त्या चित्रासंदर्भात मुले जे काही सांगतात किंवा बोलतात ते त्या चित्राजवळ शिक्षकाने लिहून द्यावे. मूल ते सहजपणे वाचते. कारण ती त्याचीच निर्मिती असते. अशाप्रकारे मूल फार सहजपणे आणि आशयपूर्ण वाचन करायला लागते. याच प्रवासात मुलांना अक्षर आणि स्वरचिन्ह परिचय शिक्षकाने अलगदपणे समोर मांडायचे असते.

मुलांना शाळेत आल्यानंतर थेट लिहायला सांगितल्यास मुलांना ते कठीण जातं व मग कित्येक मुलांच्या लेखनाच्या समस्या निर्माण होतात. मात्र चित्र मुले आवडीने काढतात. चित्र काढणे ही मुलांची गरज असते. कारण चित्र म्हणजे अभिव्यक्ती. अभिव्यक्ती ही माणसाची मूलभूत गरज आहे. या गरजेची पूर्तता करण्यासाठी मुले चित्र काढतात. त्यामुळे पेन्सिलवर पकड मिळविणे, स्नायू मजबूत होणे, हात हवा तसा फिरवता येणे या सर्व गोष्टी साध्य होतात. नुसतीच पानभर उभी रेषा, आडवी रेषा काढणे हे काम मुलांना कंटाळवाणे वाटते. मात्र चित्र काढतांना मुले कंटाळत नाहीत व आपोआपच सर्व प्रकारच्या रेषा व गोल काढणे मुलांना सहजपणे जमू लागते व मुलांना आनंदही मिळत राहतो. याशिवाय चित्र काढण्यासाठी मुलांना वेगवेगळी माध्यमेदेखील शिक्षकाने उपलब्ध करून द्यावीत. वाळूत चित्र काढणे, जमिनीवर बोटाने किंवा काडीने चित्र काढणे, रांगोळीने चित्र काढणे वगैरे.

मुलांना साचेबद्ध चित्रांमध्ये अडकवू नये. अमकेच चित्र काढ असे सांगू नये. मुलांना मुक्तपणे चित्रं काढू द्यावीत. मुले चित्रातून आपल्या कल्पना, भावना व्यक्त करतात. ते करू द्यावे. मुलांनी काढलेल्या चित्रांबद्दल शिक्षकांनी मुलांशी बोलावे. चित्रात काय काढले आहे हे त्याच्याकडून जाणून घ्यावे व ते त्या चित्राजवळ लिहावे. मुले चित्रांच्या गोष्टी तयार करतात. तर कधी गोष्ट ऐकून त्यानुरूप चित्र काढतात. मुलांच्या या गोष्टींची व चित्रांची हस्तलिखिते बनवावीत. ती मुलांना वाचून दाखवावीत. मुलांसाठी ते अतिशय परिणामकारक वाचन साहित्य बनते. मुलांना ते वाचायला आवडू लागते.

कारण त्यातील चित्रे, गोष्टी, वर्णन त्यांचे स्वतःचे असते. ते त्याच्या परिचयाचे असते त्यामुळे मुलांना ते लवकर वाचता येते. त्यातील शब्द, वाक्ये मुले विसरत नाहीत. यातूनच लिपी परिचय होत जातो. जे बोलतो, जे करतो ते लिहिता येते ही गोष्ट मुलांना कळत जाते. यातून अनेक गोष्टी साध्य होतात. मुख्य गोष्ट घडून येते ती म्हणजे, मुलांना अभिव्यक्त होता येते व वाचणे आणि लिहिणे शिकणे ही गोष्ट कष्टमुक्त होते. आनंदमयी होते. अभिव्यक्त होता येणे हे मानवी जीवाच्या विकास प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वाचे असते.

आपण लहान मुलांचा शिकण्याचा प्रवास बघितला तर आपल्याला दिसते, की मुले जन्माला आल्यापासून अगदी सहजपणे सर्व गोष्टी शिकत जातांना दिसतात. श्वास घेणे, दुध पिणे, पालथे पडणे, रांगणे, उभे राहणे, चालणे, वस्तू उचलणे, पकडणे, तोंडात टाकणे, फेकणे, घरातील लोकांचे चेहरे ओळखणे या गोष्टी मुलांना कुणीच शिकवत नाही. अगदी सहजपणे या क्रिया टप्प्या टप्प्यानुसार मुल शिकतांना दिसते, घरातील माणसाना त्या त्या नात्याने हाक मारणे, घरातील, परिसरातील वस्तू ओळखणे, त्याच्याशी आंतरक्रिया करणे, त्यांचा उपयोग करणे वगैरे गोष्टी ऐकून, पाहून आणि अनुकरणातून मुले शिकतात, या गोष्टी शिकण्यासाठी घरातील माणसे बाळाला अत्यंत प्रेमाने सहकार्य करतात आणि अगदी सहजतेने मुले हे सर्व शिकत जाताता, जर एखादं गंभीर अपंगत्व किंवा मेंदूला इजा झाली असेल तरच बाळाच्या शिकण्यात अडथळे येतात. अन्यथा सर्व अवयव धडधाकट असलेली सर्व मुले अगदीच सहजपणे या सर्व गोष्टी शिकताना दिसतात.

मूल त्याच्या आजूबाजूला दिसणाऱ्या, घडणाऱ्या गोष्टी सहजपणे ग्रहण करते. कारण ते ग्रहण करण्यासाठी त्याच्यावर कुणाचं बंधन नसतं. मात्र वर्गात चालणारे वाचन लेखन ग्रहण करण्यास मुलांना जड जातं याचा अर्थ वर्गात सर्व मुलांसाठी पोषक वातावरण नाही असा होतो. वर्गात प्रत्येक मुलास निवांत वाटले पाहिजे हे फार महत्त्वाचे आहे. असे होत नसल्यास काही मुले मागे पडतात. मुलांनी वाचन लेखन शिकावं असं वाटत असेल तर त्याच्या आजूबाजूला त्याला वाचन लेखन दिसायला हवं यासाठी

मुलांनी वाचायला शिकावं असं वाटत असेल तर त्याच्या आजूबाजूला त्याला वाचन दिसायला हवं. वाचनाचे नमुने त्याच्यासमोर सादर व्हायला हवेत. मुलांना वाचून दाखविणे फार महत्त्वाचे आहे. मूल सहजपणे बोलायला शिकतं कारण जन्मल्यापासून त्याच्या आजूबाजूला माणसे बोलत असतात, त्याच्याशी बोलत असतात. तव्हा ते मूल सुरुवातीला बोलाणाराकडे बघतही नसतं. नंतर बघायला लागतं पण म्हणून काही ते त्यांच्यासोबत लगेच संवाद साधत नाही आणि म्हणून त्याचे आप्तस्वकीय काही त्याच्यावर नाराज होत नाहीत किंवा असेही म्हणत नाहीत, की आम्ही एवढे बोलतोय पण हे मूल अजून बोलत नाही. कारण त्यांना माहीत असते हे बोलणार आहे. दैनंदिन जीवन जगताना बोलणे ही एक अपरिहार्य गोष्ट आहे. मात्र वाचन ही अपरिहार्य गोष्ट नाही म्हणून ती मुद्दामहून मुलांसमोर आणावी लागते. त्याला आवडेल, त्याच्या भावविश्वाशी जुळेल, त्याच्या परिसराशी जुळेल, ज्यात मजकुराशी संबधित भरपूर चित्रे असतील ही चित्रे लिखित मजकुराचा अर्थ लावण्यास सहाय्यभूत होत असतील असे साहित्य मुलांना वाचून दाखवावे लागते. ओघवते, प्रभावी कसे वाचायचे, वाचताना कोठे थांबायचे, वाचनाचा अर्थ कसा लावायचा, वाचल्यानंतर विचार करायचा या सर्व गोष्टी मुलांना कळायच्या असतील तर शिक्षकाने मुलांसमोर वाचायला हवे. वाचनातील चढ उतार, आरोह अवरोह मुलांना दिसायला हवेत त्यामुळे शिक्षकांनी मुलांसमोर वाचायला हवे. प्रत्येकच वेळी आपण वाचत असताना मुले आपल्या समोरच असली पाहिजे असा आग्रहदेखील धरू नये. मुले फार काळ एका गोष्टीकडे अवधान ठेऊ शकत

नाहीत. मुले खेळत असतील तरीदेखील शिक्षकाने अधून मधून स्वतःसाठी काहीतरी वाचत बसावे. मुलांना ते दिसते व त्यामुळे 'वाचायचे' असते हे मुलांना समजू लागते. हे असे एकट्याने वाचत असताना कधी प्रकट वाचावे मुले खेळत असतील तरी त्यांचे लक्ष असते. आणि कधी मूकवाचन करावे त्यामुळे मुले मूकवाचन या गोष्टीशी परिचित होतात. वर्गात चालणाऱ्या या सर्व व्यवहारातून मुलांचा लिखित साहित्याशी परिचय होत जातो. हे लिखित साहित्य त्याला खुणावू लागते. ते त्याकडे आकर्षित होते. स्वतः पुस्तक धरून ते अवलोकन करू लागते. पुस्तकातील चित्रे बघून त्याला गोष्टीची कल्पना येऊ लागते. आपण वाचून दाखविलेली ती गोष्ट त्याला आठवू लागते. त्याला स्वतःला ते वाचण्याची प्रेरणा होऊ लागते व या प्रेरणेतून 'वाचन' करणे ही त्याची गरज बनते व मग ते अक्षर, स्वरचिन्हे माहीत करून घेण्याकडे लक्ष देऊ लागते. वाचनासाठी असे स्वतः प्रेरित झाल्यामुळे वाचन ही त्याची गरज बनते व ही वाचनाची प्रक्रिया आनंददायी बनते.

वाचन लेखन लवकर शिकणे, पहिल्या वर्गातच खडखड वाचायला शिकणे ही महत्त्वाची गोष्ट नाही. वाचणे व लिहिणे अभिव्यक्त होत होत शिकणे, वाचनाचा आनंद लुटत शिकणे, विचार, कल्पना करत करत शिकणे हे फार महत्त्वाचे आहे. यासाठी दोन वर्षे लागलीत वाचन शिकायला तरी त्याबद्दल शिक्षकाने न्यून बाळगण्याचे कारण नाही. कारण मुलांना लिपी वाचन शिकवायचे नाहीये; तर मानवाच्या व विश्वाच्या अखिल जीवनात चालणाऱ्या क्रियाकलापांविषयी व त्या क्रियाकलापांचे अर्थ, त्यामागील विचार, प्रेरणा, त्यानुसार वाचकाच्या मनात निर्माण होणाऱ्या भावना, त्यानुरूप घ्यावयाचे निर्णय हे त्या साहित्यातून समजून घ्यायला शिकवायचे आहे. एवढे समजून घ्यायचे तर वाचन शिकविण्याची घाई करून चालणार नाही. वाचल्यानंतर त्याचा अर्थ समजून घेता यायला हवा. त्यावर विचार करता यायला हवा. योग्य अयोग्य असा निर्णय घेता यायला हवा. वाचलेल्या साहित्याचा आपले वैयक्तिक व सामाजिक जीवन समृद्ध करण्यासाठी, अधिक प्रगत करण्यासाठी लाभ घेता यायला हवा. सामुदायिक जीवनातदेखील वाचून समजून निर्णय घेता यायला हवेत. उदा. 'नो पार्किंग'चा बोर्ड वाचल्यानंतर येथे गाडी लावायची नाही हा निर्णय घेता यायला हवा. 'येथे थुंकू नये' अशी पाटी वाचल्यानंतर तेथे न थुंकण्याची भावना मनात यायला हवी. तिरका क्रॉस काढलेल्या हॉर्नचे चिन्ह बघून हा हॉर्न वाजविण्यास मज्जाव असलेला भाग आहे हे आकळायला हवे. आणि हे सगळे समजायचे तर वाचन शिकण्याची सखोल प्रक्रिया शिक्षकांनी समजून घ्यायलाच हवी. ●


## Form IV

परिवर्तनाचा वाटसरू या पाक्षिक नियतकालिकाच्या
स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

प्रकाशन स्थळ : ५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, पुणे ४११०११
प्रकाशन काळ : पाक्षिक
मुद्रक : प्रकाश बडगुजर
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : नर्मदा ऑफसेट, २१४, नारायण पेठ, पुणे ४११०३०
प्रकाशक व मालक : अभय गुलाबचंद कांता
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : एफ ७०४, इटर्निटी कॉम्प्लेक्स, तीन हात नाका, ठाणे (प.) ४००६०४
संपादक : प्रज्ञा दया पवार
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : एफ ७०४, इटर्निटी कॉम्प्लेक्स, तीन हात नाका, ठाणे (प.) ४००६०४
मी, अभय गुलाबचंद कांता असे जाहीर करतो, की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

**अभय कांता**
प्रकाशक